# प्रकाशाच्या वाटेवर

– मेहेर निरगुंदीकर

या वर्षी आपण पुण्यात 'वेध'चे आयोजन करत आहोत... पळशीकरसरांनी सांगितले आणि मी अगदी बाळबोध प्रश्न विचारला होता– ''सर वेध म्हणजे काय?'' हा प्रश्न विचारताना कदाचित मलाही कळले नव्हते, हाच माझ्या आयुष्याचा टर्निंग पॉईंट ठरणार आहे.

सन २०११ मध्ये पहिल्यांदा पुण्यामध्ये 'वेध'चा कार्यक्रम पार पडला. या पहिल्या कार्यक्रमात मी 'वेध'ची एक कार्यकर्ती म्हणून भाग घेतला. त्यानंतर डॉ. नाडकर्णींच्या 'वेध' आयोजनाच्या प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्याची मला संधी मिळाली. खरं तर त्या वेळी मी माझ्या वैयक्तिक आयुष्याच्या अतिशय खडतर काळातून जात होते अन् त्याच वेळी 'वेध'च्या निमित्ताने करियरच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संधीचे दुसरे दालन उघडले जात होते. म्हणतात ना परमेश्वर एक वाट बंद झाली की, दुसरीची दिशा दाखवतो असंच काहीस....

या वर्षी २०, २१, सप्टेंबर २०१४ ला 'वेध'चा ५० वा कार्यक्रम पुण्यात होत आहे. त्या निमित्ताने मागे वळून बघताना सहज मनात विचार आला की, 'वेध'ने मला काय दिले? दिले नाही, तर परत घडवले असे म्हटले, तर वावगे ठरणार नाही.

दरवर्षी होणारा 'वेध' आणि प्रशिक्षण यामुळे डॉ. आनंद नाडकर्णींच्या सहवासात आले आणि खऱ्या अर्थाने माझ्या घडण्याची प्रक्रिया सुरू झाली. कोणत्याही कामाला वेळच नाही, हे येत नाही, ते जमत नाही, अशा सबबी सांगणारी मी वेळेचे नियोजन तर शिकले इतकेच नव्हे, तर डॉ. नाडकर्णींच्या multitasking skill ने माझ्यातल्या 'मी'चा शोध घ्यायला भाग पाडले. ठाण्यात गेली २५ वर्ष आणि पुण्यात गेली तीन वर्ष हा कार्यक्रम होतो आहे. त्यासाठीचे अचूक नियोजन, हाती असणाऱ्या वेळेचा सदुपयोग कसा करायचा, कोणत्याही कार्यक्रमाच्या ऐनवेळी येणाऱ्या अडचणींवर कशी मात करायची. संभाषण कौशल्य आणि सगळ्यात महत्त्वाचे समोरच्या व्यक्तीच्या मनात शिरून बोलते करायचे कौशल्य या साऱ्याचे बाळकडूच जणु मिळाले आणि आज प्रत्यक्ष आयुष्यात ही त्याचा खूप फायदा होतो आहे.

शिक्षण क्षेत्रात प्राध्यापक म्हणून काम करत असताना 'वेध'ने माझी केवळ करीअरकडेच नाही, तर आयुष्याकडे पाहण्याची दृष्टीच बदलून टाकली. सुरुवातीला माझ्या विद्यार्थ्यांनी चांगले मार्क्स मिळवलेच पाहिजेत, अशी दुराग्रही असणारी मी आता मात्र मार्कांपेक्षा त्यांचा कल समजून उमजून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवण्याकडे बारकाईने पाहू लागले आहे.

'वेध'साठी आपण दरवर्षी एक संकल्पना ठरवतो आणि त्यानुसार आपले फॅकल्टी ठरतात. त्यामुळे गेली तीन वर्ष वेगवेगळ्या क्षेत्रातल्या अनेक दिग्गजांना भेटले. (पूर्ण अंध) असूनही एव्हरेस्ट चढणारी, आपल्या सारख्याच अंध मुलांसाठी स्वत:चा देश सोडून तिबेटमध्ये शाळा काढणारी सॅब्रिए, मनाच्या निर्धारावर गोबीचे वाळवंट चालत पार करणारी पहिली भारतीय सुचेता, सामान्य कुटुंबातून येऊन पॅराग्लायडिंगच्या क्षेत्रात भरीव कामगिरी करून 'पद्मश्री' मिळविणारी शीतल महाजन, ग्रामीण भागातल्या स्त्रियांचे प्रश्न जाणून त्यांच्यासाठी पहिली धूरविरहित चूल तयार करणारी प्रियदर्शनी आणि सिनेमा क्षेत्राच्या ग्लॅमरमध्ये राहूनही साहित्याची आवड जपणारी रेणुका शहाणे असो... प्रत्येकीने स्त्री असूनही आपण कुठेही कमी नाहीत हे कर्तृत्वाने सिद्ध करून दाखवलेय आणि तेच माझ्यासाठी स्फूल्लिंग ठरले. माझ्यातल्या स्त्री शक्तीची जाणीव करून देणारे!

इतकेच नव्हे, तर वयाने लहान असूनही अकरा भाषांवर प्रभुत्व असणारा रोहन शेट्टी, देवकणांच्या संशोधनात

मोलाची कामगिरी बजावणारा राजदीप चटर्जी, जगाची सागरी सफार करणारा अभिलाष टॉमी दुर्दम्य इच्छाशक्ती, अफाट कष्ट करायची तयारी, स्वत:वरचा विश्वास आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे हे सारे साध्य झाल्यानंतरही जमिनीवर पाय ठेवून राहण्याची वृत्ती... कुठल्याशा अंत: प्रेरणेने प्रेरीत होवून आयुष्याच्या वाटेवरल्या अनंत अडचणींच्या खाच-खळग्यांना पार करत, स्वप्नांच्या मागे, धावणाऱ्या या साऱ्यांनी माझ्यातला 'मी' पणा संपवलाच आणि शिकवले मलाही स्वप्नांच्या मागे धावायला.... नुसतेच धावण्यास नाही, तर त्याचा ध्यास घेण्यास.

आज 'वेध'च्या निमित्ताने लिहिताना हे सारे आठवत गेले. काळोखातली वाट संपून प्रकाशाच्या वाटेवर प्रवास सुरू झालाय. आता मागे वळून पाहताना माझा मलाच प्रश्न पडतो की, हे सर्व कसे शक्य झाले? तेव्हा उत्तर मिळते. 'वेध'मुळे जागृत झालेल्या माझ्या अंत:प्रेरणेने!!

'वेध'च्या या कार्यक्रमामुळे हजारो विद्यार्थी, पालक आणि समाजातल्या इतर अनेक घटकांशी मला संवाद साधता आला. माझे अनुभव विश्वच नाही, तर भावविश्व ही समृद्ध झालेय...

'वेध'ने माझे व्यक्तिमत्त्व नव्याने घडवलंय, नकारात्मक निराशेच्या गर्तेतून बाहेर पडून भरारी घेण्यासाठी एक छानसं मोकळं आकाश माझ्यासाठी निर्माण केलंय... आणि डॉ. आनंद नाडकर्णींच्याच शब्दात म्हणावेसे वाटते-

"मेरा जीना, मेरा सपना
एक ही हो जाता...
उसके बिना, ये जीना
कैसे बीत जाता-
कैसे बीत जाता।।"

'वेध' महाराष्ट्रातल्या अगदी कानाकोपऱ्यातल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे स्वप्न मी बघते आहे. आणि मला खात्री आहे ते पूर्ण करण्याइतपत माझ्या पंखात बळ मला 'वेध'मुळे नक्कीच मिळेल.

**- मेहेर निरगुंदीकर**
पुणे


*With Best Compliments From*

**Subhash Jadhav**



Trimurti Stampings,
Atit, Karad.

*With Best Compliments From*



**Shridhar Kalburgi**

Kalburgi Stampings,
Ogalewadi, Karad.